* माहितीक*

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

१४/०८/१९

---

**पोस्टे जऊळका हददीतील दाखल मर्गची दखल घेऊन मर्डर मधील आरोपी 24 तासाचे आत अखेर जेरबंद जऊळका पोलीसांच्या परिश्रमाला यश**

दिनांक 07/08/2019 रोजी फिर्यादी नामे राजु ओंकार लेकरवाळे वय 35 वर्षे जात आंध, धंदा शेती रा उमरदरी ता मालेगाव जि वाशिम यांनी तक्रार केली की त्यांचे वडील ओकांर सिताराम लेकरवाळे वय 65 वर्षे हे दिनांक 05/08/19 रोजीचे सकाळी 10.00 वा पासुन शेतात गेले असता ते दुसऱ्या दिवसापर्यंत घरी परत आले नाहीत. दिनांक 07/08/19 रोजी सकाळी 08.00 वाजता गावातील सुधाकर चोंढकर यांचे शेतातील विहिरीजवळ मृत अवस्थेत मिळुन आल्याने पोलीस स्टेशन जऊळका येथे मर्ग क्रमांक 12/19 कलम 174 जा फौ प्रमाणे दाखल करण्यात आला.

सदर मर्ग घटनास्थळाला भेट दिल्यानंतर सदर मृतक यांचा मृतदेह हा कथ्थीया रंगाच्या लेडीज चुडीदार पॅन्ट (लेगीज) मध्ये डोक्यापासुन ते पोटा पर्यंत गुंडाळलेला अवस्थेत आढळुन आला. मृतक ओकांर लेकरवाळे यांचा मृतदेह पुर्णत: सडुन अळया पडुन कुजलेल्या अवस्थेत मिळुन आला. त्यामुळे मृतक यांचा मृत्यु नेमका कोणत्या कारणावरुन झाला हयाची उकल करणे हे पोलीसांसमोर मोठे आवाहन होते.

सदर गुन्हयाचे तपासात मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. विजय चव्हाण यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी मंगरुळपीर श्री पियुष जगताप यांना विशेष पथक तयार करण्याबाबत आदेशित केल्याने सहाय्यक पोलीस निरिक्षक जाधवर ठाणेदार जऊळका, पोउपनि कपिल म्हस्के, पो हे कॉ विलास ताजणे, पो हे कॉ ज्ञानेश्वर राठोड नापोकॉ विजय इंगोले, रन्नु रायलीवाले, पोकॉ दिपक कावरखे, पोकॉ संतोष गिऱ्हे यांचे तपास पथक तयार करण्यात आले. मृतक यांचा मृतदेह मा. वैदयकिय अधिकारी ग्रामीण रुग्णालय मालेगाव यांचेकडे शवविश्छेदनाकरीता पाठविण्यात आले.

शवविश्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर तपासात थोडी गती मिळाली सदर अहवालात मृतक ओकांर सिताराम लेकरवाळे यांचा मृत्यु त्यांचे डोक्याला मारहाण केल्याने झाला असावा व पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने मृतक यांचा मृतदेह कथीया पांढरे पटटे असलेल्या रंगाचे चुडीदार लेडीज पॅन्ट मध्ये गुंडाळुन गावातील सुधाकर चोंढकर यांचे शेतातील विहिरीजवळ टाकुन दिला. सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने ग्राम उमरदरी येथे तपास अधिकारी यांनी जावुन फिर्यादी राजु लेकरवाळे यांचे कुटुंबियांचे जबाब नोंदविले. तसेच गोपनीय माहितीद्वारे संशयित इसम नामे शालीकराम शिवराम पवार वय 65 वर्षे रा उमरदरी ता. मालेगाव जि वाशिम यांना चौकशी कामी ताब्यात घेऊन अधिक तपास केला असता पुर्व वैमनस्यांवरुन रागाचे भरात आरोपी शालीकराम याने मृतक यांचे डोक्यावर गोटा मारुन जिवाने ठार मारले व मृतक यांचे प्रेताची व्हिलेवाट लावण्याकरीता लेडीज पॅन्ट ने मृतकाचे डोक्यापासुन पोटा पर्यंत गुंडाळुन मृतकास पायाला धरुन ओढत सुधाकर चोंढकर यांचे शेतातील विहीरीजवळ नेवुन टाकले. अशा कबुली जबाबा वरुन नमुद आरोपीस 24 तासाचे आत अटक करुन गुन्हा उघडकीस आणला.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी तसेच मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. विजय चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी मंगरुळपीर श्री पियुष जगताप यांचे मार्गदर्शनाखाली, सहाय्यक पोलीस निरिक्षक जाधवर ठाणेदार जऊळका, पोउपनि कपिल म्हस्के, पो हे कॉ विलास ताजणे, पो हे कॉ ज्ञानेश्वर राठोड नापोकॉ विजय इंगोले, रन्नु रायलीवाले, पोकॉ दिपक कावरखे, पोकॉ संतोष गिऱ्हे यांनी केली.

पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम